# उत्पादक संघटनांची संख्या वाढवण्याची गरज

## व्यवस्थापकीय संचालक सुमंत चौधरी यांचे मत

पुणे : शेतकरी उत्पादक संघटनेचे ध्येय शेतकऱ्यांची स्पर्धात्मकता वाढवण्याचे, तसेच त्यांच्यासाठी उभरत्या बाजारपेठ संधींचा लाभ वाढवण्याचे आहे. आपल्याला शेती हा उद्योग अधिक शाश्वत व नफाक्षम बनवण्यासाठी अधिकाधिक सहयोगींना सहभागी करण्याच्या हेतूने ॲग्रिबिझनेस इन्क्युबेटर्सच्या माध्यमातून महाराष्ट्रात शेतकरी उत्पादक संघटनांची संख्या वाढवण्याची गरज आहे, असे मत 'एसएफएसी'चे व्यवस्थापकीय संचालक सुमंत चौधरी यांनी व्यक्त केले. 'स्मॉल फार्मर्स ॲग्रिबिझनेस कन्सोर्शियम'तर्फे (एसएफएसी) नुकतेच यशदा येथे 'महाराष्ट्र ॲग्रिबिझनेस कॉन्क्लेव्ह' (एमएसी) या परिषदेचे आयोजन करण्यात आले. परिषदेचे उद्घाटन चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. यावेळी 'बँक ऑफ बडोदा'चे ग्रामीण व कृषी बँकिंग आणि सीएसआर विभाग प्रमुख बी. आर. पटेल उपस्थित होते.




पटेल म्हणाले की, आमच्या बँकेचे महाराष्ट्रात ३२९ शाखांचे जाळे पसरले असून बँक ऑफ बडोदाने एसएफएसीला तीन कोटी नऊ लाख रुपये साह्य देण्याची कटिबद्धता प्रकट केली आहे.

शेतकरी उत्पादक संघटनांच्या प्रसारात आम्ही आघाडीची भूमिका बजावणार आहोत आणि त्यासाठीच आगामी काळात अधिक सहयोग करण्यावर भर देऊ. याच कारणासाठी आम्ही जागृती कार्यक्रमही सुरु केला आहे. 'महाराष्ट्र ॲग्रिबिझनेस कॉन्क्लेव्ह'चे उद्दिष्ट्य शेतकरी उत्पादक संघटनांचा बाजारपेठेशी संपर्क दुवा विकसित करण्याचे व त्यासाठी असे व्यासपीठ निर्माण करण्याचे आहे, जेथे सर्व सहयोगी एकत्र येऊन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांपुढील आव्हाने निश्चित करतील. शेतकरी उत्पादक संघटनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना संपूर्ण कृषी मूल्य साखळीत सहभागी करुन घेऊन शेती उद्योग नफाक्षम बनवण्याचा हेतू आहे.